# Pimpri Chinchwad Police Commissionerate

**प्रेस नोट** **ता.०२/०३/२०२१**

## “झिरो टॉलरन्स” मोहीम अंतर्गत गुन्हे शाखा युनिट-४, पिंपरी चिंचवड, ची धडक कारवाई

### वाकड हद्दित स्पा वर छापा, मसाज चे नावा खाली सुरु होता वेश्याव्यवसाय, ०५ पिडीत तरुणींची सुटका व ०३ आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल

मा. पोलीस आयुक्त सो, श्री. कृष्ण प्रकाश, पिपरी-चिंचवड यांनी अवैद्ध धंदयाचे समुळ उच्चाटन करण्यासाठी पिंपरी चिंचवड आयुक्तालयात “झिरो टॉलरन्स” मोहीम राबवण्याचे आदेश दिले होते. त्या अनुशंगाने आम्ही गुन्हे शाखेच्या अधिकाऱ्यांना अवैद्ध धंद्यांवर कारवाई करणे बाबत आदेश दिले होते.

दि. ०१/०३/२०२१ रोजी गुन्हे शाखा युनिट-४, पिंपरी चिंचवडचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रसाद गोकुळे यांना माहिती मिळाली की, फॉरेव्हर स्पा झोन स्किन केअर, क्युब रामा ग्रुप सोसायटी, दत्त मंदिर, तिसरा मजला, वाकड, पुणे या स्पावर काही तरुणींकडुन जबरदस्तीने मसाजचे नावाखाली वेश्या व्यवसाय करवुन घेतला जात आहे. सदर बातमीचे अनुषंगाने वरिष्ठांशी चर्चा करुन सापळा कारवाईचे नियोजन करण्यात आले. व एका बनावट ग्राहकास सदर ठिकाणी पाठवुन खात्री झाल्यावर वपोनि प्रसाद गोकुळे यांनी स्वतः, सपोनि देशमुख व स्टाफ सह सदर स्पावर छापा घातला असता त्याठिकाणी एकुण ०५ तरुणींना डांबुन ठेवले असल्याचे व सदर स्पाची मालक व मॅनेजर महिला नामे १) ज्योती राहुल नायडु, वय-४५ वर्षे, रा- साहील हाईटस, पाचपीर चौक, काळेवाडी, वाकड, पुणे व तिचे भागीदार नामे २) विशाल पवनकुमार अग्रवाल रा.मोहन नगर, चिंचवड, पुणे ३) आबासाहेब भाऊसाहेब तागड, रा-तागड हाऊस, अनंत पार्क, सर्व्हे नंबर-४४, ए३ काटे पुरम चौक जवळ, पिंपळे गुरव, पुणे. हे मागिल २-३ महिन्या पासुन सदर स्पा मध्ये पिडीत मुलींकडुन जबरदस्तीने स्वतःचे आर्थिक फायद्यासाठी बॉडी मसाजचे नावाखाली देहविक्रीचा व्यवसाय करवुन घेत असल्याचे निष्पन्न झाले. सदर महिलांकडुन वेश्याव्यवसाय करवून घेत असल्याची खात्री झाल्याने सदर महीलांची त्यांच्या तावडीतुन सुटका करुन त्यांना सुरक्षितते कामी ताब्यात घेवुन संरक्षणकामी रेस्क्यु फौंडेशन, संरक्षण गृह, मोहम्मदवाडी, पुणे येथे ठेवले आहे.

सदर महिला आरोपीं व तिचे इतर ०२ भागीदार यांचे विरुद्ध वाकड पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला असुन सदर महिला आरोपीस अटक करण्यात आली असुन पुढील तपास वाकड पोलीस ठाणे करत आहे.

सदरची कारवाई पिंपरी चिंचवडचे पोलीस आयुक्त, मा. श्री. कृष्ण प्रकाश सो, अपर पोलीस आयुक्त, मा. श्री. रामनाथ पोकळे सो, पोलीस उप-आयुक्त, गुन्हे मा. श्री सुधीर हिरेमठ सो, सहा. पोलीस आयुक्त, गुन्हे शाखा, मा. श्री. प्रशांत अमृतकर सो, यांचे मार्गदर्शनाखालील गुन्हे शाखा, युनिट-४ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रसाद गोकुळे, सहायक पोलीस निरीक्षक अंबरिष देशमुख, सहा.पो.उप.नि. धर्मराज आवटे, दादाभाऊ पवार, पोहवा/ प्रविण दळे, नारायण जाधव, संजय गवारे, रोहिदास आडे, अदिनाथ मिसाळ, पोना/ तुषार शेटे, लक्ष्मण आढारी, मो. गौस नदाफ, पोशि/ शावरसिध्द पांढरे, प्रशांत सैद, सुनिल गुट्टे, तुषार काळे, सुरेश जायभाये, धनाजी शिंदे, आजिनाथ ओंबासे, सुखदेव गावंडे, गोंविद चव्हाण, मपोशि/ २७६४ माळी यांनी केली आहे.

( सुधीर हिरेमठ)भा.पो.से.
पोलीस उप-आयुक्त-गुन्हे
पिंपरी चिंचवड